REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चोकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख ३० एप्रिल, १९४१ अंक १८

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

' पायोनियर डाइंग हाऊस '

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

देशी औषधें तयार करणारा
महाराष्ट्रांतील प्रमुख कारखाना
पंडु (ॲनिमिया) व सर्व प्रकारच्या आजारानंतर येणाऱ्या

अशक्ततेवर

रक्तवर्धक

वापरा.

सर्वत्र मिळतें.

—: केंद्रें :—
पुणें, मुंबई, उमरावती, नागपूर, सांगली, कोल्हापूर, हुबळी.

आयुर्वेद रसशाळा
पुणें, लि. पुणें ४.

दि सदर्न निटिंग वर्क्स, लि.
[ २६४ शनिवार, पुणें २. ]
यांनीं बनविलेली

"पूना होजिअरी"

उन्हाळ्यासाठी गंजीफ्रॉक, अंडरवेअर्स वगैरे हरतऱ्हेचा

जाळीचा माल

तयार होत आहे

आपल्या व्यापाऱ्याकडे चौकशी करा

★

ठेवी : मुदतीप्रमाणें ४॥ ते ६ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

★

माहितीसाठीं वरील पत्त्यावर लिहा.

# विविध माहिती

### वेस्टर्न इंडिया मॅच कं. लि.

वरील कंपनीचे सर्व कारखाने १९४० सालीं चांगल्या तऱ्हेनें चालले. इमारतीच्या व यंत्रांच्या घसाऱ्यासाठी ४ लक्ष, २० हजार रुपये बाजूस काढूनहि कंपनीस ३० लक्ष, ८८ हजार रुपये नफा झाला. त्याची भागीदारांस ७% डिव्हिडंड व २% बोनससाठीं ६ लक्ष, ३० हजार रुपये; ५ लक्ष रुपये कच्चा मालावरील घसाऱ्यास;१ लक्ष, ७२ हजार रुपये मॅनेजिंग एजंटांना जादा कमिशन व २५ लक्ष, १४ हजार रुपये शिलक, अशी वाटणी होणार आहे. शिलक राखलेली रकम खूपच मोठी दिसते. त्यांतून कंपनीस यावा लागणारा कर भरला जाईल. कंपनीचे संग्रहीं कच्चा माल भरपूर आहे. कंपनीस १९३८ सालीं विक्रीचें उत्पन्न २ कोटि, ४५ लक्ष रुपये झालें. उत्पादनाचा खर्च ७१ लक्ष रुपये आला. कंपनीनें एक्साइज ड्यूटी १ कोटि, १५ लक्ष रुपये भरली. १९३८ सालीं कंपनीस ४½ लक्ष रुपये व १९३९ सालीं १३½ लक्ष रुपये नफा झाला होता. १९४० च्या नफ्याचा आकडा ३० लक्ष, ८८ हजार रुपये आहे.

### पुणें शहर म्युनिसिपॅलिटीचें नवें कर्ज

मुंबई सरकारच्या संमतीनें पुणें शहर म्युनिसिपॅलिटीनें ७० हजार रुपयांच्या कर्जासाठीं टेंडरें मागविलीं आहेत. नंबर दोनच्या शहर सुधारणा योजनेसाठी हें कर्ज उभारण्यांत येत आहे. कर्जावर ४% व्याज मिळेल. मुदलाची फेड ५ वर्षांनीं केली जाईल. ५ मे पर्यंत टेंडर्स पाठविण्याची मुदत आहे. १०० रुपयांखालील कर्जरोख्यांचे अर्ज चालणार नाहींत. अर्जाबरोबर मागितलेल्या कर्जरोख्यांच्या १०% रकम पाठविली पाहिजे.

### डॉक्टरांस विनंति

ग्रेटब्रिटनमधील लष्करी व बिन लष्करी इस्पितळांतून कामें करण्याची अमेरिकेंतील डॉक्टरांस विनंति करणारें एक पत्रक प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं काढलें आहे.

### चेक्सची देवघेव

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाउसमध्यें १८ एप्रिल, १९४१ अखेर संपलेल्या आठवड्यांत १८ कोटि, १० लक्ष रुपये किंमतीच्या १,२५,५१५ चेक्सची देवघेव झाली.

### आगी

अमेरिकेंतील जंगलांत शेकडो आगी घरादारांची व जमिनींची नासधूस करीत आहेत. त्यांनीं अनेक माणसांचा बळी घेतला आहे.

### एअर ग्राफ

बाल्कन्समधील सैनिकांचा ग्रेट ब्रिटनमधील लोकांशीं पत्रव्यवहार सुलभतेनें चालू रहावा, ह्यासाठीं एअर ग्राफ पत्रांची योजना करण्यांत येणार आहे. सैनिकांच्या पत्राचा एका छोट्या फिल्मवर फोटो घेण्यांत येईल. ही फिल्म विमानानें ग्रेटब्रिटनकडे पाठविण्यांत येईल. तेथें फिल्म एनलार्ज करून त्यापासून फोटो छापून तो इष्ट स्थळीं धाडण्यांत येईल. ४,५०० फिल्म्सचें वजन अर्धा शेर भरेल. म्हणजे, कमी वजनांत अधिक पत्रें पाठविण्याची सोय होईल. ग्रेटब्रिटनमधूनहि अशीं पत्रें पाठविण्याची व्यवस्था लवकरच करण्यांत येईल.

### शेतकरी कर्जनिवारण कायदा-शिक्षणवर्ग

हा वर्ग जळगांव येथें ता. ३ मे १९४१ पासून चार दिवस श्री. विनायक गणेश तिखे हे चालविणार आहेत. या वर्गामध्यें या कायद्याची माहिती चर्चात्मक रीतीनें सांगोपांग देण्यांत येईल. विशेष माहिती जळगांव सें. को. ऑ. बँकेंत मिळेल, असें व्यवस्थापक कळवितात.

### जपानचें जर्मनीकरण ?

"जपानी राष्ट्रीय जीवनास, शक्य तर उद्यांपासून, जर्मनीमधील नियंत्रण पद्धतीचें वळण लावीन" असें मि. मात्सुओका, जपानचे परराष्ट्रीय मंत्रि, हे युरोपांतून जपानमध्यें परत आल्यावर म्हणाले.

### मोटारींचा कारखाना मद्रासमध्यें काढा

म्हैसूरमध्यें स्थापन होत असलेला मोटारींचा कारखाना मद्रास प्रांतांत स्थापला जावा, अशी हिंदुस्थान व मद्रास सरकारास विनंति करणारा ठराव सदर्न इंडिया चेंबर ऑफ कॉमर्सनें केला आहे.

### दारूच्या जाहिरातींवरील बंदी उठली

मुंबई प्रांतांत प्रसिद्ध होणाऱ्या वृत्तपत्रांस दारूच्या जाहिराती छापण्यास सरकारनें बंदी केली होती. तथापि, विदेशी दारूबाबत मुंबई सरकारास सवलतीचें धोरण अंगीकारावें लागल्यानंतर त्यांच्या जाहिरातींवरील बंदी कायम ठेवण्याचें प्रयोजन उरलें नाहीं, ह्या दृष्टीनें सरकारनें ही बंदी आतां उठवली आहे.

### कपड्यांचें उत्पादन

हिंदुस्थानांतील कपड्यांच्या कारखान्यांत दरमहा २२ लक्ष नग तयार होतात. गेल्या महायुद्धाचे वेळीं १९१७ मध्यें सर्वांत अधिक कपडे दरमहा तयार होत असत, त्यापेक्षां सध्याचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर आहे.

### आय. सी. एस. मधील हिंदी नोकर

हिंदुस्थानच्या सनदी नोकरींत व तत्सम दर्जाच्या नोकरींत ६१७ हिंदी व ५८५ युरोपियन लोक आहेत. ह्या ६१७ पैकीं १२१ नोकर प्रांतिक सिव्हिल सर्व्हिस अथवा वकील वर्ग ह्यांतून वर घेतलेले आहेत.

### हिंदी सरकारी रेल्वेजचें उत्पन्न

| | रोख |
|---|---|
| १-४-३९ ते ३१-३-४० ( नक्की ) | ९८,४३,००,००० |
| १-४-४० ते ३१-३-४१ (अंदाजे) | १,११,२०,००,००० |

### मॅट्रिकचे उमेदवार

मुंबई विश्वविद्यालयाची मॅट्रिकची परीक्षा झाली, तिला एकूण २६,८८४ विद्यार्थी बसले होते. गेल्या वर्षीपेक्षा यंदा उमेदवारांची संख्या सुमारें ३,७०० अधिक आहे.

### युद्ध फंड

मुंबई प्रांताच्या युद्धफंडाचा आकडा आतां ६०½ लाखांवर गेला आहे.

### साक्षर स्त्रिया

१९३१ सालीं मुंबई प्रांतांत २ लक्ष, ४४ हजार स्त्रिया साक्षर होत्या. आतां त्यांची संख्या ८ लक्ष, ६७ हजार झाली आहे.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २०६ | आणि निर्गत व्यापार | |
| २ लल्लूभाई सामळदास ह्यांचें चरित्र ... | २०७ | ५ मेंढ्यांची सुधारणा | २११ |
| ३ आयुर्विम्यासंबंधीं एक निवाडा ... ... | २०८ | ६ कोंबड्यांचे संबंधांत संशोधन ... ... | २११ |
| ४ स्फुट विचार ... | २०९ | ७ फळांवरील प्रयोग | २११ |
| बाल्कन्समधील हालचाल—युद्धपरिस्थितींवर प्रकाश—कॅनडाच्या हुंडणावळीस अमेरिकेचें सहाय—ब्रिटिश आरमाराची भूमध्य समुद्रांत कामगिरी—एक्सचेंज बँका | | ८ बँका व युद्धपरिस्थिति | २१२ |
| | | ९ निवडक बाजारभाव | २१३ |
| | | १० "आग" म्हणजे काय ? ... ... | २१४ |


# अर्थ

बुधवार, ता. ३० एप्रिल, १९४१

## लल्लूभाई सामळदास ह्यांचें चरित्र

जुन्या पिढीच्या संस्कारांस नवीन विचारांचें वळण लावण्याची उदार बुद्धि, सार्वजनिक हिताचीं कामें करण्याची हौस, आबाल-वृद्धांशीं खेळीमेळीनें वागण्याची हातोटी, स्वदेशी उद्योगधंद्यांच्या उत्कर्षासाठीं संघटित प्रयत्नांस सहाय देण्याची तयारी, गरीब व मागसलेल्या शेतकरी वर्गाकरितां सहकारी संस्था स्थापून त्यांच्या हितार्थ झटण्याची वृत्ति, राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीस स्वतःच्या शक्तीप्रमाणें हातभार लावण्याची सदिच्छा, निरलसपणें सतत उद्योग करीत रहाण्याची मानसिक व शारीरिक पात्रता, इत्यादि अनेक गुणांच्या एकत्र साहचर्याचे योगानें दिवंगत सर लल्लूभाई सामळदास ह्यांनीं मुंबई प्रांताच्या जीवनांत महत्त्वाचें स्थान स्वतःसाठी निर्माण केलें होतें. मि. एस. नटराजन ह्यांनीं त्यांचें बोधकारक अल्पचरित्र* इंग्रजी भाषेंत नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे, त्यावरून सर लल्लूभाई ह्यांचा स्वभाव आणि कौटुंबिक व सार्वजनिक जीवन ह्यांची चांगली ओळख पटते.

भावनगरच्या राजकारणी कुटुंबामध्यें लल्लूभाईंच्या वाडवडिलांची गणना प्रामुख्यानें होत असे. त्यांचे आजे, वडील व चुलते संस्थानांत मोठ्या हुद्यावर नोकर होते. त्यांचे पिते संस्थानचे दिवाणहि झाले. लल्लूभाई जुन्या वळणाच्या नागरसमाजांत जन्मले व वाढले तरी शिक्षणानें, उपजत बुद्धीनें व विचारानें त्यांच्या कल्पनांस नवी व उदारमतवादित्वाची दिशा लागली. मुंबई येथें एलफिन्स्टन कॉलेजांत ते भावनगरहून शिकावयास गेले पण तेथें त्यांचा शिक्षणक्रम पुरा होऊं शकला नाहीं. भावनगरच्या संस्थानी कारभारांत त्यांस जागा मिळाली आणि राज्यव्यवस्थेच्या कामाचा अनुभव त्यांस आला. नानाप्रकारचे ग्रंथ वाचण्याचा त्यांस नाद ह्याच वेळीं लागला आणि त्या काळच्या स्वतंत्र मतवादी इंग्रजी लेखकांच्या विचारांशीं त्यांचा परिचय झाला. विविध-प्रकारांच्या ज्ञानाच्या आवडीचा त्यांच्या पुढील चरित्रावर मोठा व इष्ट असा परिणाम झाला. जमीनमहसूल व रेलवेज, ह्या दोन सात्यांच्या कारभारांत त्यांनीं विशेष लक्ष घातलें पण एकवीस वर्षांच्या वयांत त्यांस पत्नी व पिता ह्यांच्या निधनाचा धक्का सोसावा लागला. त्यांचे बंधु, विठ्ठलदास, हे भावनगरचे दिवाण झाले आणि आपले पिते सामळदास, ह्यांच्या स्मारकाच्या व्यवस्थेचें काम दरबारनें त्यांचेकडे सोपवलें. सामळदास कॉलेज स्थापण्याची कल्पना लल्लूभाईंची ती अनेक अडचणींस तोंड देऊन त्यांनीं पुरी केली. ह्यापुढें सोळा वर्षें दोघां बंधूंनीं भावनगरचा राज्यकारभार चांगल्या रीतीनें केला, पण संस्थानच्या गादीवर नवीन महाराजांची स्थापना होतांच लल्लूभाईंस आपल्या नोकरीचा राजीनामा देऊन मुंबई येथें सन १९०० मध्यें स्वतःच्या चरित्राच्या दुसऱ्या प्रकरणास आरंभ करावा लागला.

कित्येक जुन्या मित्रांच्या सहायानें लल्लूभाईंनीं मुंबईच्या व्यापारी, औद्योगिक व शैक्षणिक जगांत पदार्पण केलें आणि शेतकऱ्यांच्या सोयीसाठीं एक बँक स्थापन करण्याच्या कल्पनेपासून त्यांच्या सहकारविषयक सार्वजनिक कामगिरीस प्रारंभ झाला. हिंदुस्थान सरकारच्या मदतीनें एक मोठी अखिल भारतीय बँक काढण्याची कांहीं परकीय भांडवलवाल्यांची योजना होती. देशी भांडवल व साहस ह्यांचा लल्लूभाईंनीं पुरस्कार करून सर विठ्ठलदास ठाकरसी ह्यांच्या नेतृत्वानें त्यांनीं मुंबईची प्रांतिक सहकारी बँक स्थापन करून तिला सरकारचा पाठिंबा मिळवला. हिंदी सहकारी चळवळीचे आद्य प्रणेते ह्या नात्यानें लल्लूभाईंनीं अत्यंत महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. तिचें अखेरचें निदर्शक म्हटलें म्हणजे मुंबई प्रांतिक जमीनगहाणाच्या बँकेच्या स्थापनेंत त्यांनीं घेतलेला पुढाकार हें होय. सर्व हिंदुस्थानभर त्यांच्या पोक्त व अनुभवी सल्ल्याचा फायदा सरकारी व बिनसरकारी सहकारी कार्यकर्त्यांस अखेरपर्यंत होत राहिला.

औद्योगिक, व्यापारी, विम्याच्या वगैरे मंडळ्या स्थापण्यांत त्यांनीं पुढाकार घेतला आणि सिंदिया नॅव्हिगेशन, टाटा आयर्न अँड स्टील, इंडियन सिमेंट, बाँबे लाईफ इन्शुअरन्स इत्यादि कंपन्यांशीं त्यांचा उत्पादक व संचालक म्हणून निकटसंबंध आला. होतकरू लोकांस हाताशीं धरून व त्यांचेवर विश्वास टाकून स्वदेशी धंद्यांचा विस्तार घडवून आणण्याचे कामीं त्यांनीं आपला वेळ, बुद्धि व पैसा खर्ची घातला. ह्या बाबतींत योग्य व कार्यक्षम कार्यकर्त्यांच्या अभावीं त्यांच्या पदरीं अनेक वेळां निराशा आणि तोटा ह्यांचें बक्षीस पडलें, पण त्यांनीं अशा आघातांनीं आपल्या मनाची शांतता बिघडवूं दिली नाहीं. तत्त्वज्ञानाचे दृष्टीनें जगाकडे पहाण्याची संवय त्यांनीं स्वतःस लावून घेतली होती, तिचें हें फळ होय. वाढत्या वयांतहि त्यांनीं इंग्लंडचा व जपानचा प्रवास केला ह्यावरून त्यांचें मन शेवटपर्यंत तरुण असल्याचें दिसून येतें. सार्वजनिक कार्याच्या विविध क्षेत्रांत त्यांनीं एवढी विस्तृत कामगिरी केली आहे कीं, लल्लूभाईंचें मि. नटराजन ह्यांनीं चरित्र लिहिलें आहे त्यापेक्षां कितीतरी पटीनें मोठें चरित्र प्रसिद्ध होणें आवश्यक आहे असें आम्हांस वाटतें. तथापि प्रस्तुत छोटेखानी पुस्तकांत लेखकानें लल्लूभाईंचें स्वभाववैशिष्ट्य उत्तम रेखाटलें आहे ह्यांत संशय नाहीं. प्रस्तुत लेखकाचा "लल्लूकाका" आणि त्यांच्या कुटुंबांतील मंडळी ह्यांच्याशीं अनेक वर्षें अत्यंत घरोब्याचा संबंध होता. ह्या कारणानें मि. नटराजन ह्यांनीं लल्लूभाई ह्यांच्या गुणांचें व कामगिरीचें केलेलें वर्णन त्यास उत्कृष्ट रीतीनें पटलें आहे. लल्लूभाई ह्यांच्या चिरंजीवानीं आपल्या वडलांचें औद्योगिक कार्य पुढें चालू ठेवलें आहे. आणि श्री. वैकुंठराय ह्यांनीं स्वार्थत्यागपूर्वक चालवलेली जनसेवा प्रसिद्धच आहे.

* "Lalubhai Samaldas" by Mr. S. Natarajan: Yeshanand Publications Ltd. Price As. 8/-

## आयुर्विम्यासंबंधीं एक निवाडा

**थोरल्या भावानें धाकट्या भावाच्या नांवानें आयुष्याचा विमा काढल्यास धाकट्या भावाचे मृत्यूनंतर त्या विम्याचे पैसे थोरल्या भावाला मिळतील काय ?**

हकीकत

डॉ. मणीशंकरला जी. एस. पंड्या ह्या नांवाचा एक धाकटा भाऊ होता. जी. एस. पंड्या सावकारी करीत असे व फावल्या वेळांत डॉ. मणीशंकरकडे कंपाऊंडरचें काम करीत असे. डॉ. मणीशंकरला जी. एस्. पंड्याचे आयुष्याचा विमा काढावयाचा होता म्हणून त्यांनीं रिस्पाँडर बँकेकडून विम्याचा फॉर्म मागविला व तो स्वतः लिहून त्यावर आपली सही करून बँकेकडे ( विमा कंपनीकडे ) पाठविला. डॉ. मणीशंकरला जी. एस्. पंड्याचे आयुष्यांत विमा काढण्यालायक हित नाहीं. ह्या मुद्यावर विमा कंपनीनें तो फॉर्म परत पाठविला व त्यावर जी. एस्. पंड्यानें आपली सही केली पाहिजे असें कळविलें. नंतर डॉ. मणीशंकरनें दुसरा फॉर्म भरून त्यावर जी. एस. पंड्याची सही घेऊन तो विमा कंपनीकडे पाठविला. विमा २०,००० रुपयांचा होता. विम्याचे हप्ते डॉ. मणीशंकर चेकचे द्वारें पाठवीत असे. विमा काढल्यानंतर जी. एस. पंड्याचे नांवाची पॉलिसी आली. ती पॉलिसी जी. एस्. पंड्यानें डॉ. मणीशंकरला असाईन ( लिहून दिली ) केली. विमा काढल्यापासून थोडेच दिवसांचे आंत जी. एस्. पंड्या मरण पावला म्हणून डॉ. मणीशंकरनें विम्याच्या रकमेची मागणी केली. डॉ. मणीशंकरला विम्याची रक्कम देण्याचें विमा कंपनीनें नाकारलें व ज्या पॉलिसीबद्दल मागणी करण्यांत आली होती, ती रद्द करण्याकरितां चालू दावा आणला. खालच्या दोन्ही कोर्टांत विमा कंपनीतर्फे निकाल झाला म्हणून डॉ. मणीशंकरनें हें अपील केलें होतें.

मुद्दे व विवेचन

विमा कंपनीचे मुद्दे असे आहेत—

"डॉ. मणीशंकरनें धोकेबाजीनें व कंपनीचा गैरसमज करून वादांतील विम्याचा करार घडवून आणला असल्यामुळें तो रद्द आहे. त्या कराराशी जी. एस्. पंड्याचा फक्त नांवापुरता संबंध होता. डॉ. मणीशंकरला जी. एस्. पंड्याचे आयुष्यांत विमा काढण्यालायक कोणतेंही हित नव्हतें. विम्याचा करार केवळ जुगाराच्या स्वरूपाचा होता."

डॉ. मणीशंकरचा बचाव असा आहे—

"त्यानें कंपनीशी धोकेबाजी केली नाहीं अथवा कंपनीचा गैरसमज देखील करविला नाहीं. जी. एस्. पंड्या आपल्याकडे कंपौंडरचें काम करीत असल्यामुळें त्याचे आयुष्यांत विमा काढण्यालायक आपल्याला हित होतें. विम्याचा करार जुगाराच्या स्वरूपाचा नव्हता."

ह्या अपिलाचा निकाल 'विमा काढण्यालायक हित' ह्या शब्दप्रयोगाच्या अर्थावर अवलंबून आहे. इंग्लिश इन्शुअरन्स ॲक्टमध्यें ह्या शब्दप्रयोगाची दिलेली व्याख्या फार आकुंचित असल्यामुळें अमेरिकन ॲक्ट चालू मुकदम्याला लागू करण्यांत यावा, असा डॉ. मणीशंकरतर्फे आमच्यासमोर युक्तिवाद करण्यांत आला आहे. अमेरिकन ॲक्ट लागू केला तरी त्यापासून डॉ. मणीशंकरला फायदा होण्याचा मुळींच संभव नाहीं. त्या कायनुसार झालेल्या निवाड्यांत असें ठरविण्यांत आलें आहे कीं, विमा 'काढण्यालायक हित' ( इन्शुअरेबल इंटरेस्ट ) प्राप्त होण्यासाठीं ज्यानें विमा काढला तो ज्याचा विमा काढला त्याच्यावर अवलंबून असला पाहिजे. खालच्या कोर्टांनीं असें ठरविलें आहे कीं, जी. एस. पंड्या स्वतंत्रपणें सावकारीचा धंदा करीत असे व डॉ. मणीशंकरला तो कोणत्याही प्रकारची मदत करीत नसे केव्हां केव्हां जी. एस. पंड्या डॉ. मणीशंकरच्या कंपौंडरचें काम करीत असे. ह्यावरून असें दिसून येईल की, डॉ. मणीशंकर जी. एस. पंड्यावर अवलंबून नव्हता व जी. एस्. पंड्याचें आयुष्य वाढल्यास त्यापासून डॉ. मणीशंकरला भरीव फायदाही होण्यासारखा नव्हता. आपल्या कंपौंडरच्या आयुष्याच्या विमा काढण्याचे हेतूनें डॉ. मणीशंकरनें जी. एस्. पंड्याच्या आयुष्याचा विमा काढला नाहीं असें गृहीत धरून चालण्यास मुळींच हरकत नाहीं. जी. एस्. पंड्या मध्येंच नाहींसा झाल्यास त्याच्या विम्याचे पैसे आपल्याला मिळतील ह्या आशेनें डॉ. मणीशंकरनें जी. एस्. पंड्याचे आयुष्याचा विमा काढला ह्याबद्दल आम्हाला शंका नाहीं. ही आशा जुगाराच्या संदर्भात खास येते.

डॉ. मणीशंकरतर्फे अशी हरकत आणण्यांत आली आहे कीं, जी. एस् पंड्यानें आपल्या आयुष्याचा विमा काढला होता ही गोष्ट विमा कंपनी आतां नाकबूल करूं शकत नाहीं, कारण विम्याच्या फॉर्मवर जी. एस्. पंड्याची सही आहे. शिवाय जी. एस्. पंड्याच्या विम्याचे हप्ते भरण्यास विमा कंपनीनें डॉ. मणीशंकरला केव्हांही बंदी केली नाहीं. लेखी व तोंडी पुरावा विचारांत घेऊन खालच्या कोर्टानें असें ठरविलें आहे कीं, विम्याच्या फॉर्मवर केवळ आपली सही करण्यापलीकडे जी. एस्. पंड्यानें कांहीं एक केलें नाहीं. सर्व कांहीं डॉ. मणीशंकरनें केलें. डॉ. मणीशंकरनें आपल्या स्वतःच्या हितासाठी व फायद्यासाठी जी. एस्. पंड्याचे आयुष्याचा विमा काढला ह्याबद्दल आम्हाला मुळींच शंका नाहीं. कारण त्याचा असा उद्देश नसता तर एवढा खटाटोप करण्याची व विम्याचे हप्ते जवळून भरण्याची डॉ. मणीशंकरला मुळींच गरज नव्हती.

निकाल

सबब हें अपील खर्चासह काढून टाकून खालच्या कोर्टांनी दिलेले निकाल आम्हीं कायम ठेवतों व ह्या निकालावर लेटर्स पेटंट अपील करण्याची अपिलंटला परवानगी देतों.

सारांश

विमा कंपनीशीं धोकेबाजी करून अथवा तिचा गैरसमज करवून घडवून आणलेला विम्याचा करार रद्द करून मागण्याचा विमा कंपनीला अधिकार असतो. स्वतःचा फायदा करून घेण्यासाठीं दुसऱ्याच्या आयुष्याचा विमा काढल्यास विमा कंपनी तो विम्याचा करार रद्द करवूं शकते. अशा परिस्थितींत असें सिद्ध केलें पाहिजे कीं, ज्यानें खरोखर विमा काढविला त्याला ज्याचा विमा काढविला त्याचें आयुष्यांत विमा काढण्यालायक हित होतें हें सिद्ध करण्यासाठी ज्यानें विमा काढविला तो ज्याचा विमा काढला मेला त्याच्यावर अवलंबून होता असा पुरावा दिला पाहिजे. एका नातलगानें दुसऱ्या नातलगाच्या अथवा एका भावानें दुसऱ्या भावाच्या आयुष्याचा विमा काढल्यास ज्यानें विमा काढला त्याला ज्याचा विमा काढला त्याचे मृत्यूनंतर त्या विम्याचे पैसे मिळतील असें समजूं नये. अशा प्रकारचा विम्याचा करार विमा कंपनी रद्द करवूं शकते. परंतु वर दिलेल्या गोष्टी सिद्ध केल्यास तो करार रद्द होणार नाहीं. "न्यायबोध" वरून

# स्फुट विचार

## बाल्कन्समधील हालहवाल

युगोस्लाव्हियाचे राजे पीटर आणि त्यांचे मंत्रि शत्रूच्या हातांतून निसटून बाहेर पडले आहेत. स्वतःचा देश आपणांस कोणत्या परिस्थितींत सोडावा लागला ह्याचें वर्णन करून युगोस्लाव्हिया पुन्हां स्वतंत्र होईपर्यंत आपण झगडत रहाणार असें त्यांनीं निश्चयात्मक आश्वासन स्वतःच्या लोकांस दिलें आहे. युगोस्लाव्हियाची युद्धाची तयारी नव्हती आणि जर्मनीच्या प्रचंड सेनेपुढें त्याचा टिकावहि लागला नसता. अशा स्थितींत एका बाजूनें इटली व दुसऱ्या बाजूनें जर्मनी ह्यांच्या कचाटींत तो देश सापडला असतां तेथील लढाया बंद होणें क्रमप्राप्त होतें. हंगेरी, बल्गेरिया व इटली ह्यांनीं गिधाडांप्रमाणें पडलेल्या युगोस्लाव्हियावर उड्या घातल्या आहेत आणि त्याची वाटणी आपापसांत करून घेण्याविषयींच्या त्यांच्या वाटाघाटी चालू झाल्या आहेत. वरील राष्ट्रांपैकीं प्रत्येक जण ऐसपैस पाय पसरूं पहात आहे आणि स्वतःस सोयीचे प्रदेश निवडून काढून आपापल्या मुलखास जोडूं पहात आहे. अॅड्रिॲटिक समुद्रांत आपलें वर्चस्व निर्धास्त राहील अशा रीतीनें इटलीस वाटणींत हिस्सा पाहिजे आहे. बल्गेरियानें स्वतःची पश्चिम सरहद्द पुढें सारली आहे व ग्रीसच्या थ्रेसपैकीं भाग त्यास हवा आहे. ग्रीसनें मात्र इंग्लंडच्या सहायानें आपल्या सैन्याची फळी फोडूं न देतां शत्रूशीं निकरानें युद्ध चालू ठेवलें. बाल्कन्समधील राष्ट्रांनीं एकी न केल्या कारणानें जर्मनीनें त्यांचें सर्वांचें स्वातंत्र्य नष्ट करून त्यांस स्वतःच्या सत्तेखालीं आणलें आहे. ग्रीस व इंग्लंड ह्यांच्या पराक्रमामुळें जर्मनीच्या योजना पूर्वसंकल्पाप्रमाणें सिद्धीस गेल्या नाहींत आणि हिटलरला जबरदस्त नुकसान सोसावें लागलें आहे. जर्मनीच्या झंझावातापुढें ग्रीक सैन्याचा टिकाव लागणें शक्य नव्हतें आणि अखेरीस ग्रीक सरकारास आपलें ठाणें क्रीट येथें हालवावें लागलें आहे. ग्रीससारख्या चिमुकल्या राष्ट्रानें दाखवलेलें धैर्य व त्याचा अतुल पराक्रम ह्यांचेविषयीं त्याचें सर्वत्र होणारें अभिनंदन योग्यच आहे.

---

## युद्धपरिस्थितीवर प्रकाश

हिटलरच्या पुढील डावपेचांचा अंदाज बांधून ब्रिटिश सेनांनीं ग्रीसमध्यें जर्मन हल्ल्यांस तोंड दिलें आणि शत्रुसैन्याची प्रगति शक्य तितकी कुंठित केली. स्पेन व तुर्कस्थान ह्यांस धाकदपटशा दाखवून आणि फ्रेंच मुत्सद्यांवर दडपण टाकून तसेंच, जपानची पूर्व आशियांतील महत्त्वाकांक्षा प्रदीप्त करून, युद्धाच्या ज्वाला दूरवर भडकवण्याचा हिटलरचा बेत असावा असा तर्क करण्यांत येत आहे. हिटलरची आजवरची कारस्थानें पाहिलीं असतां अशा प्रकारचे प्रयत्न करण्यास तो मागेंपुढें पहाणार नाहीं ह्याविषयीं शंका नाहीं. प्रस्तुत युद्ध लांबणें हिटलरच्या फायद्याचें नाहीं. अमेरिकेची मदत सारखी वाढत्या प्रमाणावर इंग्लंडला पोहोंचत असून ब्रिटिशांचें युद्धसामर्थ्य झपाट्यानें वाढत आहे. हिटलरच्या भावी हालचालींची व कारवायांची कल्पना ब्रिटिश मुत्सद्यांस आहे आणि इराकमध्यें त्यांनीं फौज नुकतीच पाठवली आहे हें त्या गोष्टीचें गमक आहे. प्रसंग पडल्यास तुर्कस्थानला एशियामधून मदत मिळावी अशी ही व्यवस्था आहे. टोब्रुकमध्यें राहून ब्रिटिशांनीं जर्मन फौज इजिप्तच्या सरहद्दीपर्यंत कशी येऊं दिली गेली ह्याचें गूढ कित्येकांस पडलें होतें. त्याविषयींचा खुलासा प्रसिद्ध झाला आहे त्यावरून ब्रिटिश सेनानींच्या आफ्रिकेंतील धोरणावर चांगला प्रकाश पडतो. युगोस्लाव्हिया जर्मनीपुढें मुळींच टिकाव धरूं शकणार नाहीं अशी कल्पना करणें प्रथम अशक्य होतें. पण युगोस्लाव्हियांत कठिण परिस्थिति निर्माण होऊन जर्मन सैन्य ग्रीसमध्यें झपाट्यानें घुसूं लागल्या कारणानें ब्रिटिश सेनानींस आफ्रिकेंतील आपली फौज तिकडे तातडीनें नेणें भागच होतें. हें अवघड काम चाललें असतां जर्मन व इटालियन सैन्य इजिप्तच्या सरहद्दीच्या मार्गानें त्वरित चालून गेलें. त्याची गति तेथें मंद झाली असून टोब्रुक येथें ब्रिटिशांनीं शत्रूची तारांबळ उडवली आहे ह्यावरून जर्मनीनें आफ्रिकेंत कांहीं विशेष साधलें असें म्हणतां येणार नाहीं. उलट; पूर्व आफ्रिकेंतून इटालिअन फौजेची हकालपट्टी झाली आहे आणि ॲबिसीनियांतहि तीस आतां कसलाच आधार राहिलेला नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. ग्रीसला वेळीं ब्रिटिश कुमक पोंहोचूं नये हा जर्मनीच्या पश्चिम आफ्रिकेंतील हालचालींचा मुख्य उद्देश होता. तो यशस्वी झाला नाहीं. ब्रिटिश फौज ग्रीसमध्यें आपल्या दोस्ताच्या खांद्यास खांदा लावून लढली आहे. सारोनैका व लिबिया येथें जर्मन फौजेची थोडी प्रगति झाली आहे तिला, एकंदर युद्धपरिस्थितीचा विचार करतां फारसें महत्त्व नाहीं हें सूक्ष्म विचाराअंतीं सहज ध्यानांत येईल. ब्रिटिश वैमानिक दल आणि आरमार ह्यांनीं चालवलेल्या वाढत्या कामगिरीकडे पाहिलें म्हणजे परिस्थिति आटोक्यांत आहे असेंच म्हणावें लागेल.

---

## ब्रिटिश आरमाराची भूमध्य समुद्रांत कामगिरी

ब्रिटिश सत्तेचें समुद्रावर वर्चस्व एवढें प्रचंड आहे कीं, त्याविरुद्ध जर्मनीनें चालवलेले प्रयत्न विफल झाले आहेत. एका बाजूस जिब्राल्टर व दुसऱ्या बाजूस अलेक्झांड्रिया ह्या दोन टोकांच्यामध्यें ब्रिटिश आरमार भूमध्य समुद्रांत आपलें वर्चस्व गाजवीत आहे. इटलीचें दक्षिणेकडील बंदर कटाना येथून उत्तर आफ्रिकेंतील ट्रिपोली केवळ ३१० मैल आहे. तेवढें अंतर अंधेरांत तोडून जर्मन व इटालियन जहाजांनीं लढाऊ सामुग्री आफ्रिकेंत नेली आणि तिच्या जोरावर सोलमपर्यंत शत्रूनें चाल केली. कटाना-ट्रिपोलीच्या जलमार्गापासून ब्रिटिश आरमाराचीं मुख्य ठिकाणें फार दूर आहेत. अगदीं जवळचें ठाणें माल्टा हें होय. पण तें अलेक्झांड्रियापासून ८२७ मैल आणि जिब्राल्टरपासून ९९१ मैल आहे. टोब्रुकहि ट्रिपोलीपासून ५७० मैल दूर आहे. ब्रिटिश आरमाराची नजर चुकवून शत्रूची युद्धसामुग्री ट्रिपोलीस गेली तरी ती त्या आरमाराच्या माऱ्यांतून सुटूं शकत नाहीं. आफ्रिकेंतील रणांगणाचा सबंद रस्ता समुद्रकिनाऱ्यालगत आहे आणि तो ब्रिटिश आरमाराच्या माऱ्याच्या पल्ल्यांत आहे, ह्या कारणानें शत्रूच्या हालचाली केवळ विमानदलच बंद पाडीत नसून त्यावर ब्रिटिश आरमाराचेहि हल्ले चालले आहेत. शत्रूच्या चिलखती गाड्या समुद्र ओलांडून आल्या आणि त्यांनीं इजिप्तची सरहद्द गाठली तरी त्या ब्रिटिश आरमाराच्या तडाख्यांत आहेत ह्याची जाणीव त्यांस आरमारी लोकांनीं करून देण्याचा क्रम चालू ठेवला आहे.

---

### कॅनडाच्या हुंडणावळीस अमेरिकेचें सहाय

लोकशाही नियंत्रित राष्ट्रें जर्मनीच्या विरुद्ध स्वतःच्या व पर्यायानें इतरांच्या स्वातंत्र्यासाठी स्वार्थत्यागपूर्वक झगडत आहेत, त्या सर्वांस युद्धसामुग्री पुरवण्याची जबाबदारी अमेरिकेनें स्वतःच्या शिरावर घेतली आहे. ह्या रीतीनें अमेरिकन राष्ट्र लढाऊ सामुग्रीचें कोठार बनलें आहे. इंग्लंडला पुरवावयाच्या मालाच्या किंमती त्या राष्ट्रास रोखीनें देतां येत नसल्यानें तो माल उसनवारीनें व भाड्यानें देतां यावा अशी तजवीज अमेरिकन कायद्यानें केली आहे. इंग्लंडसाठी कॅनडामध्यें युद्धसामुग्री मोठ्या प्रमाणावर बनवली जात आहे आणि तिला लागणारा अर्धापक्का माल अमेरिका पुरवीत आहे ह्या व्यवहारांत कॅनडानें अमेरिकेस द्यावयाचें देणें निघतें त्याची भरपाई कशी व्हावी हा प्रश्न अलीकडे उपस्थित झाला तेव्हां कॅनडाचे मुख्य प्रधान. मि. मॅकेंझी किंग ह्यांनीं वॉशिंगटन येथें जाऊन अमेरिकन अधिकाऱ्यांशीं वाटाघाटी केल्या आणि हुंडणावळीचा प्रश्न समाधानकारक रीतीनें निकालांत काढला. अमेरिका खंडाच्या संरक्षणाची योजना कॅनडा व अमेरिकन राष्ट्र ह्यांनीं सहकार्यानें आणि परस्परांस जरूर तो माल पुरवून करावी अशी योजना आतां मान्य करण्यांत आली आहे. कॅनडाच्या विशिष्ट जातींच्या मालाच्या मोबदल्यांत अमेरिकेनें यंत्रांसारखा माल पुरवावा आणि तो इंग्लंडच्या नांवें लिहिला जावा हें प्रस्तुत योजनेंतलें मूलभूत तत्त्व आहे. सुमारें शंभर कोटि रुपये किंमतीच्या मालाच्या मोबदला ह्याप्रमाणें प्रतिवर्षी कॅनडा व अमेरिका ह्यांचे दरम्यान होऊन इंग्लंडला आवश्यक असलेली युद्धसामुग्री सोईनें पुरवली जाऊन हुंडणावळीची अडचण नाहींशी होईल. ह्या व्यवस्थेस मि. मॅकेंझी किंग ह्यांनीं विशेष महत्त्व दिलें आहे ह्याचें कारण युद्धसामुग्री पुरवठ्याच्या मार्गांत हुंडणावळीस येणारा अडथळा तिच्या योगानें दूर झाला आहे हें होय. चीन देशाची चलनव्यवस्था जपानच्या कारवायांमुळें बिघडली आहे, तिला स्थैर्य यावें म्हणूनहि अमेरिका चिनी सरकारास पैसा पुरवीत आहे. ह्या पैशाच्या आधारानें चिनी चलन व हुंडणावळ हीं स्थिर रहातील अशी व्यवस्था केली जात आहे.

---

### एक्सचेंज बँका आणि निर्गत व्यापार

कोणत्याहि देशाच्या परराष्ट्रीय देवघेवींमध्यें निर्गत व्यापारास विशेष महत्त्व असतें. ह्या व्यापारांत निघणाऱ्या हुंड्यांच्या साहाय्यानेंच आयात व्यापारामधलें परराष्ट्रीय देणें भागवतां येत असल्याकारणानें निर्गतीकडे मध्यवर्ती बँका व सरकार ह्यांस लक्ष पुरवावें लागतें. युद्ध-परिस्थितींत हुंडणावळ व परराष्ट्रीय देवघेव ह्यांचें नियंत्रण केल्यावांचून गत्यंतर नसतें. आज इंग्लंडमध्यें ह्या बाबतींत कडक नियंत्रण अर्थातच घालण्यांत आलें आहे. कोणत्या मालाच्या आयात-निर्गतीस वाव किंवा सवलत यावी हें राष्ट्राच्या सांपत्तिक स्थितीच्या दृष्टीनें सरकारास ठरवावें लागतें. निर्गत व्यापारास उत्तेजन देऊन त्या बाबतच्या हमीचाहि स्वीकार करणें सरकारास आवश्यक वाटतें. हाच नियम हिंदुस्थानच्या निर्गत व्यापारास लागू आहे. एक्सचेंज बँकांच्या हुंडणावळी संबंधांतल्या धोरणाविषयीं कलकत्त्याच्या व्यापारी मंडळींनीं रिझर्व्ह बँकेकडे तक्रार केल्याचें प्रसिद्ध झालें आहे, त्या बाबतींत खुलाशाचें दोन शब्द लिहिणें आवश्यक आहे. हुंडणावळीचे दोन महिन्यांच्या मुदतीचे दर युद्ध चालू होतांच रिझर्व्ह बँकेनें निश्चित केले. दोन महिन्यांच्या मुदतीचे व्यवहार करणें आपणांस कठिण आहे, अशी तक्रार व्यापाऱ्यांनीं केली तेव्हां सरकारनें ही मुदत सहा महिन्यांपर्यंत वाढवून दिली आणि हुंडणावळीचा दर रुपयास आठरा पेन्स असा ठरवून टाकला. परराष्ट्रीय व्यापारी हुंड्यांचे व्यवहार एक्सचेंज बँकांचे कक्षेंत येत असल्यानें त्यांनीं रिझर्व्ह बँकेच्या विद्यमानें जरूर ती व्यवस्था केली आणि दर रुपयास एक बत्तिसांश पेनी ह्या प्रमाणें नफा आकारून व्यवहार चालवला. व्यापारी मंडळीच्या मतें हा दर योग्य होता. पण आतां एक्सचेंज बँका एक सोळांशाच्या दरानें हुंडणावळीवर नफा घेऊं इच्छित आहेत अशी त्यांची तक्रार आहे. निर्गत व्यापारांतील हुंड्यांच्या पैशाबाबत एक्सचेंज बँकांवर नुकसानीची जबाबदारी येत नसून त्याविषयींची हमी रिझर्व्ह बँकेनें घेतली असल्याकारणानें बँकेस नफ्याच्या दरांत वाढ करण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं असें त्यांचें म्हणणें आहे. व्यापारी लोक निर्गतीचा व्यवहार करतात तो कित्येक प्रसंगीं सध्याच्या परिस्थितींत इष्ट वाटण्यासारखा नाहीं, असें बँकेच्या वतीनें सांगण्यांत येत आहे. परंतु ज्याअर्थी सरकारनें हुंड्यांची मुदत दोन महिन्यांची सहा महिनेपर्यंत लांबवली आहे त्याअर्थी बँकेच्या ह्या म्हणण्यांत कांहीं तथ्य नाहीं असें व्यापारी मंडळीचें बँकेच्या युक्तिवादास उत्तर आहे. निर्गत व्यापार व हुंडणावळ ह्यांविषयींचे प्रश्न युद्ध-परिस्थितींत अत्यंत नाजुक आणि जिव्हाळ्याचे असल्यानें हिंदुस्थान सरकार कलकत्त्याच्या व्यापारी मंडळीच्या तक्रारीचा विचार योग्य रीतीनें करील ह्यांत शंका नाहीं.

---

### लोकल बोर्डांचा उत्पन्न खर्च

मुंबई प्रांतांतील लोकल बोर्डांच्या १९३९-४० मधील उत्पन्न-खर्चाचे आंकडे खालीं दिले आहेतः— रु.

एकूण उत्पन्नः १ कोटि, ७७ लक्ष.

एकूण खर्चः १ कोटि, ७८ लक्ष.

| | शिक्षणावर खर्च लक्ष रु. | वैद्यकीय मदतीसाठी खर्च लक्ष रु. | रस्ते वगैरे साठी खर्च लक्ष रु. |
|---|---|---|---|
| उत्तर भागः | ३१ १/३ | ३ | १२ १/४ |
| मध्य भागः | ५३ १/२ | ४ | १६ १/२ |
| दक्षिण भागः | ३५ | २ ३/४ | ८ ३/४ |

---


## औषधाशिवाय रोगमुक्त व्हा !

आरोग्य चिकित्सा शिक्षक—डॉक्टर, वैद्यांच्या औषधाला कंटाळलेले रोगी निसर्गसिद्ध सुलभ उपायांनीं सहज बरे करून आरोग्याचा अखण्ड सुखोपभोग घ्या ! पैसा वांचवा ! किं. १॥ रु.

लंघन-चिकित्सा शिक्षक—प्लेग, कॉलरा, व इतर हट्टी रोग औषधाशिवाय फक्त लंघनें करून रोगमुक्त व्हा ! वज्रदेही बना ! नवी तिसरी आवृत्ति. किं. १॥ रु. ट. ह. शिवाय. यादी फुकट. प्रो. ज्ञानमित्र, शनवार, पुणें २.

### मेंढ्यांची सुधारणा.

प्रांतांतील गुरांढोरांच्या सुधारणेसंबंधीं कामांत, भांबुर्डा, पुणें, येथील शीप् ब्रीडिंग रीसर्च स्कीम ही अन्वयें करण्यांत आलेल्या कामाचा विशेष उल्लेख करणें जरूर आहे. या योजनेवर सरकारच्या लाइव्हस्टॉक् एक्सपर्टचें नियंत्रण असून तीस आर्थिक मदत मुख्यतः इंपीरियल कौन्सिल ऑफ् ॲग्रिकल्चरल रीसर्चकडून होत असते. या योजनेअन्वयेच्या कामाचा रोख मेंढ्यांच्या दख्खनी जातीची सुधारणा, (१) निवड करून व (२) दक्षिण आफ्रिकेंतील मेंढ्यांच्या मेरीनो जातीशीं तिचा संकर करून, करण्याकडे आहे. १९३९-४० मध्यें या दोनहि दिशांनीं पुष्कळच प्रगति करण्यांत आली व शिवाय, लोंकरीची प्रतवारी लावणें व निवड करणें, ती कातणें व रंगविणें ह्या योगानें स्थानिक धनगरांस आपल्या मालाची अधिक चांगली किंमत मिळणें शक्य व्हावें म्हणून लोकरीच्या उपयोगाबाबत केलेल्या प्राथमिक चौकशीवरून महत्त्वाचे व आर्थिकदृष्ट्या मूल्यवान असे निष्कर्ष मिळविण्यांत आले आहेत.

### कोंबड्यांचे संबंधांत संशोधन

इंपीरियल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रीसर्च हें प्रांतांतील कोंबड्यांच्या संशोधनाबाबत शास्त्रीय कामाच्या खर्चाखातरहि रकम देत असतें. हें काम सरकारी सेंट्रल पोल्ट्री फार्म, खडकी, येथें केंद्रित झालें आहे. कोंबड्या बाळगण्याच्या धंद्याच्या आर्थिक प्रश्नाकडे या स्टेशनांत विशेष लक्ष्य देण्यांत येतें; तसेंच या स्टेशनांत कोंबड्या बाळगण्याच्या धंद्यांत कोंबड्यांची उत्पत्ति, खाणेंपिणें व व्यवस्था यांसंबंधीं शास्त्रीय प्रश्नाबाबत व लाइव्हस्टॉक धंद्यांतील या शाखेच्या विद्यार्थ्यांना व्यावहारिक शिक्षण देण्याबाबत कामांतहि हें स्टेशन गुंतलेलें आहे. गुरांच्या उत्पादनासंबंधीं शास्त्रीय कार्य, चरोडी [ कांक्रेज जात ] व बांकापूर [ अमृतमहाल जात ] येथील सरकारी कॅटल फार्मांत व मुंबईची गोरक्षक मंडळी [ गीर जात ] यांसारख्या बिनसरकारी संस्थांच्या सहकार्यानें चालूं होतें. महत्त्वाच्या नेमाड व डांगी जाती यांसंबंधीं अशाच स्वरूपाचें कार्य योग्य केंद्रांत लवकरच सुरू करण्यांत येईल.

### फळांवरील प्रयोग

खडकी येथील सरकारी फळांवरील प्रयोगासंबंधीं स्टेशन येथें इंपीरियल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रीसर्चकडून मदत मिळत असलेल्या कोल्ड स्टोरेज रीसर्च योजनेअन्वयेच्या कामाचें सहावें वर्ष पुरें झालें व चालू असलेल्या कामाच्या कार्यक्रमांत, निरनिराळ्या फळांच्या गॅस स्टोरेजसंबंधीं प्रयोगाचें काम हें आतां ज्यास्त जोडण्यांत आलें आहे. प्रांतांतील मुख्य फळांच्या पिकांसंबंधानें खताचें, पाटाचें पाणी देण्याबाबतचे व मशागतीचे प्रयोग या स्टेशनांत समाधानकारक रीतीनें पार पाडण्यांत आले.

### युद्धविषयक कापडाचें उत्पादन

सरकारच्या युद्धविषयक ऑर्डरी पुऱ्या करण्याचें काम कांहीं कापड गिरण्या करीत आहेत, त्यांस इतर गिरण्यांइतका नफा उरत नाहीं, अशी तक्रार आहे. सप्लाय खात्याकडून त्यांस कांहीं सवलतीहि हव्या आहेत. युद्धविषयक कापडाच्या उत्पादनाचे संबंधांतील प्रश्नांची चर्चा करण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें कापडाच्या गिरण्यांचे मालकांची एक परिषद् भरविण्याचें ठरविलें आहे. ही परिषद् मुंबई येथें ता. ९ मे रोजीं भरेल.

संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

"अर्थ" ग्रन्थमालेंतील पुस्तकें
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.
२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.
३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.
* * *
१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.
२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.
अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.
अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

पुण्यांत आल्यावर
सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या
OUR HOME
या
कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक निवास भोजनालयांत
उतरण्यास या.
मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी
याच एका ठिकाणीं
अनुभवास येतील.
अवर होम,
६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.

## बँकांचे कार्यांत युद्धपरिस्थितीनें खोळंबा होत नाहीं.

( मिडलंड बँकेचे अध्यक्ष, राइट ऑनरेबल मॅकेना, ह्यांचें भाषण. )

" मिडलंड बँकेचे २३ हजार नोकर लष्करांत दाखल झाले आहेत. म्हणजे, पांचांपैकीं एक जण लष्करांत गेलेला आहे. २७ लोकांचा युद्धानें बळी घेतला असून तिघांचा अद्याप पत्ता लागला नाहीं. ह्याखेरीज संरक्षक दलांत शेकडो नोकर आपलें रोजचें काम संभाळून, काम करीत आहेत. बँकेच्या इमारतींची नासधूस, विमान हल्ल्यांच्या खबरीमुळें कामाच्या तासांचें नुकसान, येण्या-जाण्यांत होणारा खोळंबा, इत्यादि अडचणींतूनहि बँकेनें आपली कार्यक्षमता कायम राखली आहे व तात्पुरत्या गैरसोईपलीकडे अधिक विशेष झालेलें नाहीं. बॉंब-हल्ल्यांपासून रक्षण व्हावें, ह्यासाठीं केलेल्या तरतुदीचा उपयोग होत आहे. युद्धास प्रारंभ झाल्यापासून नोकरवर्गापैकीं जे लष्करांत दाखल झाले, त्यांची जागा घेण्यासाठीं १,९०० लोकांना नोकरीवर घेतले आहे. ह्या नोकरांस शक्य तितक्या लवकर कार्यक्षम करण्यासाठीं ठिकठिकाणीं बँकेनें ट्रेनिंग शाळा काढल्या आहेत."

### युद्धामुळें खर्चांत वाढ

( लॉइड्स बँक लि. च्या अध्यक्षांचें भाषण )

" आपला खर्च बराच वाढला आहे, कारण जे आपले नोकर लष्करांत दाखल झाले आहेत, त्यांचीं नांवें पटावरून आम्हीं काढलेलीं नाहींत. त्यांस मिळणाऱ्या लष्करी पगारापेक्षा आणि भत्त्यापेक्षां त्यांचा मूळ पगार जेवढा जास्त होता, तेवढी रकम आम्ही त्यांस दरमहा देतों. लोक नवीन नेमले आहेत, त्यांचा पगारहि द्यावा लागतो. युद्धजन्य इतर खर्चहि कमी नाहीं. वाढत्या खर्चाच्या तोंडमिळवणीसाठी जादा भत्ते, कामाची ठिकठिकाणीं वाटणी, दप्तराच्या अनेक प्रति करून ठेवण्याची आवश्यकता, बॉंबहल्ल्यांपासून संरक्षण करण्यासाठी योजना, इत्यादि अनेक कारणांमुळें बँकेचा खर्च वाढला आहे.

### युद्धप्रयत्नांची कमाल केली पाहिजे

( नॅशनल प्रॉव्हिन्शिअल बँकेच्या अध्यक्षांचें भाषण )

" सन १९४० चें सिंहावलोकन केलें, तर असें दिसून येतें कीं, गेलें वर्ष अनेक प्रयोग करण्यांत, चुका सुधारण्यांत गेलें. १९४१ सालीं लष्करी हालचाली काय होतील, हें आज सांगतां येणार नाहीं. तथापि आपणांस कितीहि विजय मिळाले, तरी आपली कसोटी पणास लावण्याची वेळ येईल, हें उघड आहे. आपल्या देशाचें सर्व बळ युद्धोपयोगी मालाच्या उत्पादनाचे कामीं उपयोगांत आणलें जात आहे. परंतु अद्याप त्यांत सुधारणा होण्यास वाव आहे. नागरिकांच्या रोजच्या गरजा भागविण्यास पुरेसा माल मिळणार नाहीं व त्यामुळें होणाऱ्या कच्च्या मालाचा व कामगारांच्या वेळेचा विनियोग युद्धकार्याकडे केला जाईल. आपला निर्गत व्यापार वाढविण्याची आवश्यकता ह्यापुढें आणखी तीव्र होईल. विशेषतः अमेरिकेकडे आपण अधिक माल पाठविला पाहिजे. त्या देशाचे लोक आपल्या युद्धप्रयत्नांस उत्कृष्टपणें हातभार लावीत आहेत."

दि
बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड
सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो
बँकेची शेअर-विक्री चालू आहे
मुख्य कचेरी
लक्ष्मी रोड, पुणें.
मुंबई शाखा — दलाल स्ट्रीट, कोट
पुणें शाखा — डेक्कन जिमखाना

दक्षिण कोंकणांतील राष्ट्रीय बाण्याचें
प्रमुख साप्ताहिक
हिंद–सेवक
संपादक—सदानंद शांताराम भांडारकर
प्रकाशक—मधुकर यशवंत भांडारकर
हिंदसेवकमध्यें दर गुरुवारीं रत्नागिरी जिल्ह्यांतील सर्व घडामोडींची विस्तृत माहिती मिळते.
व्यवस्थापक—'हिंद–सेवक', मालवण, जि. रत्नागिरी.


मधुमेहावरील औषध
तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

कोरोना पोर्टेबल विकणें आहे.
कोरोना पोर्टेबल टाइपरायटर उत्तम स्थितींतला खासगी कामासाठीं वापरलेला, विकणें आहे.
"क्ष" C/o अर्थ.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... ... | ११०—४ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४-५ |
| ३½% विनमुदत ... ... ... ... | ९४—२ |
| ३½% १९४७-५० ... ... ... | १०२—८ |
| ३% ( १९६३-६५ ) ... ... ... | ९४-१२ |
| २¾% १९४८-५२ ... ... ... | ९६-१४ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०७—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०७—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३) — .. | ११५—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... — | १२५—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००-५० ) ११% ... ... | १३७—८ |
| बँक ऑफ बडोदा (१००—५०) १०% ... ... | १०७-१२ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ४१—२ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५२०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०३—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ३३% ... ... | १३२—० |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१५—४ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २२५-१० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १५४५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १८४०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०४—४ |
| पाचोरा-जामनेर ( १०० ) ३½% ... ... | ५८—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ८४६—४ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ६४१—४ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | ११८—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००-५० ) २ रु. ... ... | ४५—० |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | १८—४ |
| न्यू इंडिया विमा ( ७५-१५ ) १ रु. ८ आ. ... | ४१—४ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ३९४०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २१२—८ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. ... | १४७—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३४५—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पे... | ११६६—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १२८—८ |

#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४२-९-६ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ६२-१३ |


प्रेमामृताचा अखंड झरा वहात असे या गरीबांच्या झोपडींत—

पण गरीब लोक म्हणजे समाजाचे गुन्हेगार !




नवयुगचा कोंकणच्या नयनरम्य सौंदर्यसृष्टीच्या पार्श्वभूमीवरील नवीन सामाजिक बोलपट

★

: दिग्दर्शक : विनायक

: कथासंवाद : खांडेकर

: फोटोग्राफी : पां. नाईक

: भूमिका :

*मिनाक्षी, ललिता पवार, बेबी देवी, बाबुराव पेंढारकर, साळवी, दामुअण्णा मालवणकर, मा. विठ्ठल आणि विनायक*

★

न्यू वेस्ट एण्ड

मध्यें लौकरच येणार !

' पिअरलेस प्रकाशन '

## "आग" म्हणजे काय ?

### विमाविषयक कायदेशीर अर्थ

मालाचा, आगीच्या धोक्याचा विमा उतरण्याची पद्धत इंग्लंडमध्यें गेलीं दोनशें वर्षे चालू आहे. पण आग या शब्दाचा विमाविषयक कायदेशीर अर्थ मात्र इंग्लिश हायकोर्टांत अगदीं अलीकडेच ठरविला गेला. मिसेस हॅरिस या बाईनीं आपल्या घरांतील हरेक चीजवस्तूंचा, चोरीचा, दरोड्याचा व आगीचा विमा उतरविला होता. बाईंना चोरीची भीति विशेष वाटे म्हणून बाहेर जातेवेळीं त्यांनीं दागिने व रोकड मिळून ५०० पौंड किंमतीचा माल दिवाणखान्यांतील शेगडींत दडवून ठेविला. परत आल्यावर त्यांनीं घांदरटपणें तशीच शेगडी पेटविली. आणि जें व्हावयाचें तेंच झालें. बाईनीं विमा कंपनीकडे ५०० पौंडांची मागणी केली. कंपनीनें बाईच्या मागणीस नकार दिला; कंपनीचें म्हणणें असें कीं "पॉलिसींतील शब्दप्रयोगाच्या अर्थाप्रमाणें" आग म्हणजे वाटेल ती आग नसून 'हद्दीबाहेर भडकून नुकसान करणारा जाळ' तीच फक्त आग होय.

कंपनीनें केलेली आगीची व्याख्या कंपनीच्याच डोक्यांतून निघाली असें नाहीं; इंग्लंडमध्यें आतापर्यंत आगीच्या विम्यावरील मोठ्या अधिकृत ग्रंथांनीं व जाडच्या कायदेपंडितांनीं अशाच तऱ्हेची मल्लीनाथी केली होती. पण बाईनीं हायकोर्टांत दाद मागितली व कोर्टानें असें ठरविलें कीं "वाक्प्रचाराप्रमाणें आग म्हणजे सर्व तऱ्हेची आग. 'हद्दीबाहेर' जाळ जाण्याची अट विमाविषयक कायद्यांतच आली कोठून ? शेगडीबाहेर जाळ जाऊन दिवाणखान्यांतील पडदा पेटल्यास ती "आग" पण पडदा वाऱ्यानें शेगडीवर येऊन जळल्यास ती "आग" नाहीं असें थोडेंच म्हणतां येईल ?"

वरील निवाड्यानें 'आग' विषयक कायद्याचें समाधानकारक स्पष्टीकरण झालें आहे, तथापि आश्चर्याची गोष्ट ही कीं हें होण्यास २५० वर्षे लागलीं ! याचें कारण असें कीं आगीच्या विम्याविषयींचा कायदा सूत्रबद्ध नसून बहुतेक व्यवहार पूर्वनिर्णयाधारावरच चालतात. आणि आगीच्या विम्याच्या पॉलिसींतील लवाद-कलमान्वयें बहुतेक तंटे परस्पर लवादातर्फेंच तोडले जात असल्यामुळें अनेक कायदेशीर प्रश्नांचा कोर्टातर्फे अधिकृत निवाडा अद्याप झालेला नाहीं.


या नव्या शोधानें सर्व जगभर खळबळ उडवून दिली आहे.

# दहा हजार रुपये अगदी फुकट.

**अमृतसरमध्यें २॥ रु. तोळा सोनें**

मिनर्व्हा गोल्डची घरोघर प्रशंसा ! मिनर्व्हा गोल्ड हा नकली सोन्याचा अगदी नवा शास्त्रीय आविष्कार होय. त्यानें केवळ वैज्ञानिकांनाच आश्चर्यानें थक्क करून सोडलें एवढेंच नव्हे, तर सर्वसाधारण लोकांची एक अत्यंत मोठी उणीव भरून काढली आहे. सर्व स्त्रिया त्याच्या दागिन्यावर बेहद्द खूष होतात. ज्या घरांत हें सोनें एकदां शिरलें तेथून दोनदोनदा तीनतीनदा त्यांस मागण्या येत आहेत.

मेहेरबान लाला विशारतनसाहेब, म्युनिसिपल कमिशनर, पठानकोटाहून २५ आक्टोबरला लिहितात—"काल आपल्या सोन्याचें पार्सल मिळालें; धन्यवाद ! आपण हा नवीन पदार्थ तयार करून जगाची एक मोठीच उणीव भरून काढली आहेत. उलट टपालीं आणखी तीन तोळे सोनें पाठवावें."

याप्रमाणें उत्तर हिंदुस्थानांतील सर्व प्रसिद्ध वर्तमानपत्रें उदाहरणार्थ रियासत, काँग्रेस, स्वस्तिक, अलामान, जमीनदार, गुरुघंटाल प्रताप, इत्यादींनीं प्रशंसोद्गार खुषीनें छापले आहेत.

हें सोनें कसास लावलें तर अस्सल सोन्याचाच रंग दाखवतें आणि अस्सल सोन्याप्रमाणेंच ठोकलें व गाळलें जातें. याचे हरएक प्रकारचे दागिने बनवता येतात. नापसंत पडल्यास किंमत परत मिळण्याची गॅरंटी आहे; खास प्रसारासाठीं किंमत १ तोळ्यास २॥ रु.; ३ तोळ्यास ७ रु.; ६ तोळ्यास १२ रु.; व ४० तोळ्यास ८० रु.

**मिनर्व्हा गोल्डचे बनवलेले दागिने**

मिनर्व्हा गोल्डच्या बनवलेल्या बांगड्या दर जोडीला २ रु.; कानांतील सोन्याचे डूल दर जोडीला ३ रु.; खड्याची अंगठी ३ रु.; साधी मुंबई फॅशनची अंगठी २ रु.; जाळीच्या बांगड्या दर जोडीला ५ रु.; (नेकलेस) माळ १२ रु.; लॉकेट ६ रु.; दस्तबंद दर जोडीला १४ रु.

माल पसंत पडला नाहीं तर परतबोलीची खात्री. पोस्टाचा खर्च फक्त ८ आणे पडतो.

या गोष्टी खोट्या ठरवून देणारास दहा हजार रुपये फुकट दिले जातील. याशिवाय दर तीन तोळे सोनें खरेदी करणारास टिकाऊपणा व सौंदर्य याची १० वर्षे गॅरंटी असलेलें एक फॅन्सी रिस्टवॉच फुकट दिलें जाईल; गॅरंटीचा कागद प्रत्येक घड्याळाबरोबर धाडला जातो.

मिळण्याचा पत्ता—मॅनेजर अमेरिकन मिनर्व्हा गोल्ड हाऊस, (A. P.) K. C. अमृतसर.

राहणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपती चौक व्यवस्थापक

तमाम दंतरोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
ब्लॅक टूथ पावडर
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७१ सदाशिव, पुणें.

N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बँबाचे माडीवर

महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ता:—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

## महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ६१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.